# देशातील वाढलेल्या अन्न धान्याचे भाव आम्ही सहन करणार नाही


# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ८६] सेवाग्राम, बुधवार ता. १७ जून १९६४ [मूल्य ५ न. पै.


## विनोबाजी आणि शास्त्रींजींची जाहीर सभा

### शास्त्रीजींचे अभिनंदन

"आज आपल्या गावात सर्व संमतीने निवडून आलेले राष्ट्रनेता आले आहेत. आपल्या देशाचा फार मोठा पुढारी गेला असतांना फारसा अवधि न घालवता सर्व संमतीने नेत्याची निवड करण्यात आली ह्याबद्दल मला फार खुशी होत आहे. हा परिपक्व विचार करणारांचा देश आहे हे त्यामुळे जगाच्या नजरेसमोर आले. भारताला स्वातंत्र्य मिळून केवळ सतरा वर्षे झाली असली तरी हृया देशाच्या पाठीमागे हजारो वर्षापासूनची प्राचीन संस्कृति उभी आहे. अेका मोठ्या देशाचे नेतेपद आपल्याला लाभल्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. मला व्यक्तिशःहि त्यामुळे आनद झाला आहे. हे विनोबाजींचे' छोटेसे भाषण आटोपल्यावर भारताचे प्रधान मंत्री श्री. लालबहादूर शास्त्रीजींनी खालील प्रमाणे भाषण केले.

श्रद्धेय आचार्य विनोबाजी आणि बंधू भगिनींनो,

आचार्यजींनी सांगितल्याप्रमाणे अत्यंत कठीण परिस्थितीच्या वेळी माझ्यावर एक मोठी आणि नवी जबाबदारी टाकण्यात आली आहे. पंडितजी नंतर ती सांभाळणे ही अधिकच कठीण गोष्ट आहे.

**पंडितजींची अपुरी कामे पुरी करायची**

पंडितजी ह्या देशाचे प्रधानमंत्रीच नव्हते, तर जगातील एक सर्वोत्तम राजनीतीज्ञ होते. त्यांनी ह्या देशात स्वातंत्र्य आणले, त्याची जोपासना केली व त्याला दृढता आणली. त्यांनी जे काम आमच्यासाठी ठेवलेले आहे ते पूर्ण करणे हे आमचे काम आहे.

आमच्या देशात लोकशाही आहे आणि सर्वसंमतीने नेत्याची निवड झाली ह्याचा जगावर फार चांगला परिणाम झाला. त्यामुळे आम्ही संकटाचे वेळी एकत्र होतो हे जगाने पाहिले व आमचाहि आत्मविश्वास त्यामुळे वाढला. मोठमोठ्या राष्ट्राच्या पुढाऱ्यांनी व राजदूतांनी ह्या घटनेचे स्वागत केले. कारण नेहरू नंतर कोण हा प्रश्न सर्वांना भेडसावीत होता. आमची लोकशाही मजबूत पायावर उभी आहे हे सिद्ध झाले.

देशाचे गाडे चालायला हवे,त्यासाठी सरकारची जबाबदारी मोठी आहे. व लोकावरहि त्याची जबाबदारी आहे. लोकांना संकटात धीर देणे, संतोष वाटेल असे काम करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. आज जे सरकारतर्फे काम चालले आहे ते सर्व ठीकच चालले आहे असे मी म्हणू शकत नाही. परंतु कामाचा भार उत्तरोत्तर वाढत आहे. अडचणी वाढत आहेत.

धान्याचे भाव सारखे वाढत आहेत. आणि मुख्यतः धान्याच्या भावावरच अन्य वस्तूंचेहि भाव आधारलेले असतात. त्यामुळे लोकात असंतोष आहे. ह्यावर्षी गहू, तांदूळाचे पिक वाढलेले आहे तरीहि तेवढ्याने आपले भागत नाही. बाहेरून आपल्याला धान्य मागवावे लागते. ते आणावेच लागेल. परंतु हे काही योग्य वाटत नाही. कोठपर्यंत आम्ही अमेरिकेकडून धान्य मागविणार ?

देशात पुरेसे अन्न का निर्माण होऊ नये ? त्यासाठी सरकारने पाणी, उत्तम खत, बीबीयाणे व चांगले पशू हृयांचा पुरवठा करावा, भांडवल द्यावे, आणि शेतकऱ्यांनी त्याचा सदुपयोग करावा अशा दुहेरी पद्धतीनेच हे काम होईल. सरकार व जनता, व्यापारी व शेतकरी ह्या दोहोंनाहि आपले कर्तव्य ठीक करायचे आहे.

हृया हप्त्यात दररोज भाव वाढत असलेले मी पाहतो. काय हृया आठवड्यातच अेकदम अन्नधान्यात इतकी घट झाली आहे ! व्यापारी धान्य दाबून ठेवतील तर असेच होणार. स्वतंत्र देशाचा नागरीक हृया नात्याने प्रत्येकाने आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली पाहिजे. आज ७५–१०० रु. महिना कमाविणाऱ्या लोकांच्या जीवनातील सुखसोयी त्यामुळे नष्ट होत आहेत. लोकांच्या जीवनाशी आम्ही खेळ खेळू शकतो का ? ह्यावर विचार करण्याची वेळ आली आहे.

ता. २४ जूनला ह्या देशातील मुख्यमंत्र्यांची मी बैठक बोलाविली आहे. तेथे आम्ही केवळ चर्चाच करीत बसणार नाही. तर निश्चित निर्णय घेऊन उठू. तेव्हा व्यापारी, व्यापारी संस्था ह्यांना माझे निवेदन आहे की त्यांनी भाववाढ रोकावी. शेवटी आम्हाला नाही तर कायद्याचा मार्ग स्वीकारावा लागेल.

भारतात ऐक्य नांदले पाहिजे. सर्व धर्म पंथ, उत्तर–दक्षिणेचे लोक, हिंदी, इंग्रजी, मराठी–कानडी ह्यांच्या झगड्यापासून आम्हाला देशाचा बचाव करायचा आहे. देशात एकीच नसली तर मग कोणतेच काम होऊ शकणार नाही.

आमचे मुख्य काम गरीबी व बेकारी दूर करण्याचे आहे. सर्वांना जीवनावश्यक वस्तु मिळतील असा नवा समाज बनवायचा आहे. त्यासाठी परस्पर ऐक्य हवे आहे.

मी येथे पूज्य विनोबाजींच्या दर्शनासाठी व त्यांच्यापासून प्रेरणा घेण्यासाठी आलो आहे. पूर्वी मी विचार करीत असे की मंत्री बनून, स्वार्थ साधून विनोबांच्याकडे जाण्यात काय अर्थ आहे ? परंतु आज त्यांचा आधार मला हवा आहे. त्यांचे बळ मला हवे आहे. मी लंडनला जाण्यापूर्वी केव्हातरी त्यांना भेटणारच होतो. परंतु त्यांच्या तब्बेतीची बातमी समजल्यामुळे तावडतोब आलो. जगातील देशांचे विचारसाम्य जेथे जेथे होईल त्यांना धरून संपर्क साधल्यानेच विश्वशांतिकडे पाऊले पडतील. तिकडे जाण्यापूर्वी विनोबांना भेटल्यामुळे मला आनंद झाला आणि फार मोठा विश्वास पैदा झाला. ह्या देशाचा महिमा आहे की येथे संत पुरुष पैदा होतात. व त्यांच्या समोर राजेपण झुकतात. आज राजा तर जनताच आहे. आम्हाला परंपरा कायम ठेवायची आहे. ह्या मोटार–विमानांच्या युगात पायी कोण फिरतो ? आणि कोण लोकांना विचार देऊन जागृत करीत आहे. लोकांना विनोबा नीतीचे धडे देत आहेत. आचरणाचे नियम सांगत आहेत. परस्पराशी प्रेमाने व सहकार्याने वागण्याचा उपदेश देत आहेत. हे काम कोणतेहि सरकार करू शकत नाही. आणि अशा संतांचे सहकार्य असल्याशिवाय कोणतेही सरकार टिकू शकत नाही. लोकशाही सरकार तर मुळीच चालू शकत नाही. काही काळ हुकुमशाही चालू शकते. भारताच्या शेजारच्या देशात ती चालली आहे. परंतु भारताने आवाज उठविला की लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी लोकशाहीच आवश्यक आहे. आणि जवाहरलालजींनी आजन्म लोकशाहीसाठी त्रास घेतले. विनोबाजींच्याच मार्गाने जनमनात बदल घडवून आणता येईल. आणि विश्वास वाटतो की आम्हाला आमच्या उन्नतीच्या मार्गावरून कोणी अलग करू शकत नाही.

आम्ही ४५ करोड लोक गरीबी मिटवू असा संकल्प केला तर पहाड समुद्र तो तोडू शकत नाहीत. पण ही शक्ति सरकार द्वारा नव्हे तर संता द्वारा निर्माण होत असते. गांधीजी असेच दुबळे पतले होते. अेकटे निघाले, त्यांना लाखोंनी साथ दिला आणि इंग्रजांना जावे लागले. आणि विनोबा सुद्धा गांधीजींच्या मार्गाने चालत आहेत. नवा भारत बनविण्याची आमची इच्छा आहे. विनोबांच्या कार्याला होईल तेवढा सहयोग करण्याचा आम्ही प्रयत्न करू. आम्ही मंत्र्यांनीहि इमानदारीने चालावे व लोकांची मने जिंकावी.

आपल्या सर्वांच्या भरवशावर मी येवढे मोठे ओझे शिरावर घेतले आहे. मी आपला व विनोबांचा ऋणी आहे.

---

### —: सूचना :—

ता. २१ जून पर्यंत दैनिकाचे अंक बंद राहतील. त्या बद्दल वाचकांनी क्षमा करावी ही विनंती.

**व्यवस्थापक**

# प्रश्नोत्तरी

प्रश्न:– आपण ग्रामदानाचे काम सुरू केले, त्याप्रमाणे कारखाने मजूरांचे व्हावे असे काही काम हाती घेतले आहे काय ?

विनोबा– त्याबाबतीत थोडा प्रयत्न केला आहे. परंतु ती गोष्ट पुष्कळशी सरकारवर अवलंबन आहे. सरकारने कर बसवले त्यावेळी त्यांनी कुणाची संमति घेतली नाही. कारखानदारांना पुष्कळ कर द्यावे लागतात. त्यामुळे ते नाराज असतात. ग्रामदानात कर नसतो, दान असते. मी जर करही मागू लागलो व दानहि मागू लागलो तर कसे चालेल ? कारखान्याचा मालकी हक्क मजूरांना द्या म्हटले तर त्यात प्रश्न असा उभा राहतो की कारखाने चालवायला जी बुद्धि, टॅलेंट लागते ती मजूरा जवळ नसते. खेड्यातले सगळे लोक मिळून खेड्यांचा कारभार चालवू शकतात. कारखान्यांच्या बाबतीत ते आज शक्य नाही. कारखाने चालवायला दुनियाभरचे ज्ञान लागते. कच्चा माल कुठून आणावयाचा, मशीनरी कुठून मागवायची, पक्का माल कुठे पाठवायचा वगैरे बरेच ज्ञान लागते. म्हणून आज कारखाने मालकांच्या हातात राहतील. जसजसे मजूर सुशिक्षीत होत जातील तसतसे कारखाने त्यांच्या हाती येऊ शकतील. तेव्हा या कामात पहिली अडचण मजूरांच्या अज्ञानाची आहे व दुसरी सरकारच्या करांची आहे. तिसरी अडचण अशी आहे की मजूरात एकी नाही. राऊरकेल्याला मी पाहिले की तिथे पांच यूनियन आहेत. व त्या एकमेकांच्या विरुद्ध आहेत. मजूर त्या यूनियन्समध्ये वाटले गेले आहेत. मी त्यांना म्हटले की तुम्ही पाची संख्या एक व्हाल तर तुमचे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी मी उचलायला तयार आहे. त्यातील चार यूनियन्स वाले तयार झाले पण पाचवी तयार झाली नाही. यूनियन्स आपल्या राजकीय कारणाकरता मजूरांना वापरू इच्छितात. प्रत्येक मोठ्या शहरातील कारखान्यातील मजूरांच्या अनेक यूनियन्स असतात. व त्यांच्या मान्यामान्या चालू असतात. त्यामुळे मजूरात फूट पडते. या तीन कारणामुळे कारखान्यांच्या सामुदायिक मालकीचा प्रश्न कठिण झाला आहे.

प्रश्न कठिण असला तरी मी यावर नेहमी सांगत असतो. खेड्यातहि मी काय करतो आज तुम्हाला मी ग्रामदानाचा विचार सांगितला आणि तुम्ही नाही ऐकले. तर मी काय करणार ? मी उद्या सकाळी इथून निघून जाणार. सांगणे हे माझे काम आहे. कारखान्यांच्या मालकांनाहि विचार सांगत असतो. मधून मधून ते लोक मला भेटतात. मी प्रयत्न करून पहात असतो. साधले तर साधले. पण ग्रामदानापेक्षा यात अडचणी जास्त आहेत. आतापर्यंत सहा हजार ग्रामदाने झाली. म्हणजे अजून खूपच व्हायची आहेत. पण यामुळे माझ्या हातात जी शक्ति आली ती घेऊन मी कारखानदाराकडे जातो तर थोडसे वजन पडते. पण खूप ग्रामदाने झाल्यानंतर जाईन तर अधिक वजन पडेल. राऊरकेल्यातील पांचहि यूनीयन्सवर माझे वजन पडले नाही. कारण माझ्या हाती तेवढी शक्ति नव्हती. वजन पडले असते तर तेथील मजूरांना न्याय मिळाला असता. पण इतकेहि जे वजन पडले ते कशामुळें पडले ? सहा हजार ग्रामदाने झाली म्हणून पडले म्हणून तुम्हा खेड्यातले लोक ग्रामदाने करून मला जी शक्ति द्याल ती घेऊन मी कारखानदाराकडे जाईन.

तुम्ही ग्रामदाने कराल तर सरकार वरहि वजन पडेल. आज भारतात शेकडा ८० टक्के लोक खेड्यात राहतात. व फक्त शेकडा वीस टक्के लोक शहरात राहतात. तरीहि सरकारवर खेड्याचा रंग नाही. शहराचाच रंग आहे. शहरवाले शिक्षितहि असतात. त्यामुळे सरकारवर त्यांचेच अधिक वजन पडते. सरकारचे लक्ष खेड्यापेक्षा शहराकडेच अधिक असते. सगळ्या खेड्यांची ग्रामदाने झाली तर सरकारचा रंगच बदलेल. सगळे सरकारच खेड्यांच्या हाती येईल. मग योजना खेड्यांच्या हाती येईल सरकारची योजना ग्रामानुकूल बनेल. म्हणून सगळे तुमच्या हाती आहे. खेडे हा खालचा मजला आहे. कोणतेहि घर पाडायचे असल्यास खालचा मजला पडला की घरे आपोआप पडतात. खेडोपाडी जमीन ग्रामसभेच्या मालकीची झाली तर ती शक्ति घेऊन माझ्यासारखी माणसे कारखानदाराकडे जातील तर त्यांचा प्रभाव पडेल. आजहि आम्ही जातो. पण आमच्याजवळ शक्ति कमी आहे. म्हणून ते लोक थोडे दान देतात. पण कारखान्यांची मालकी सामूदायिक करायला तयार होत नाहीत. तसे तीन चार कारखानदार तयार झाले आहेत. त्यांनी मजूरांची मालकी केली आहे पण बाकीचे लोक फक्त दान देतात. तेव्हा तुम्ही माझी शक्ति वाढवाल तर कारखानदारावरहि प्रभाव पडेल.

---

# संत विनोबाजी व प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री ह्यांची हृदयस्पर्शि भेट

विनोबाजी आजारी पडले अशी बातमी भारताचे प्रधानमंत्री ह्यांनी ऐकताच त्यांनी श्री. श्रीमन्नारायण अग्रवाल ह्यांना विनोबांच्या भेटीला जाण्यास सांगितले. परंतु अर्ध्यातासात त्यांनी पुन्हा नवीन निर्णय घेतला. आपले सर्व कार्यक्रम रद्द केले. आणि स्वत: लगबगीने विनोबांना भेटायची तयारी केली आणि ता. १६ मंगळवार रोजी वर्ध्यावरून आठ मैल अंतरावर असलेल्या 'जामनी' गावी त्यांनी दुपारी एक वाजता विनोबांची भेट घेतली.

विनोबाजींना भेटण्यासाठी एक वाजता शास्त्रीजींनी गावात प्रवेश करताच ते मोटारीतून खाली उतरले आणि पायी चालत निघाले. विनोबाहि त्यांना सामोरे गेले. समोरून शास्त्रीजी लगबगीने विनोबाकडे आले. विनोबा त्यांना प्रणाम करणार ऐवढयात शास्त्रीजी चटकन विनोबांना प्रणाम करण्यासाठी विनोबांच्या चरणाकडे वळले असताच विनोबांनी त्यांचे प्रेमाने हात धरले.

शास्त्रीजी सोबत केंद्रिय मंत्री श्री. हजरनवीस, प्लॅनिंग कमिशनचे सदस्य श्री. श्रीमन्नारायण अग्रवाल, महाराष्ट्राचे अर्थमंत्री श्री. वानखेडे, महाराष्ट्राचे मजूर मंत्री श्री. नरेंद्र तिडके, त्याशिवाय वर्धा जिल्ह्यातील प्रमुख मंडळी आली होती.

त्यानंतर शास्त्रीजींनी विनोबाजीशी पंधरा मिनिटे बोलणी केली. विनोबाजींच्या तब्बेतीबाबत त्यांनी विशेष जिव्हाळ्याने चौकशी केली. (ह्याच अंकात विनोबांच्या तब्बेतीबाबत माहिती अन्यत्र दिली आहे.) त्यानंतर परत दुपारी अडीच ते पांच वाजेपर्यंत अडीचतास विनोबा सोबत शास्त्रीजींची खाजगी चर्चा झाली.

संध्याकाळी पांच वाजता जाहीर सभा झाली. ह्या सभेला आजू बाजूच्या खेड्यातील लोकांची एकच रीघ लागली होती. आपल्या नव्या प्रधानमंत्र्याला पाहण्यासाठी जनता आतुर झाली होती. शास्त्रीजीची नम्रता व साधेपणा पाहून लोकांनी त्यांचेबद्दल प्रसंशोद्गार काढले.

---

# विनोबाजींची तब्बेत व पुढील कार्यक्रम

ता. १२ जूनला खरांगणा मुक्कामी विनोबा बाहेर झोपले असतांना रात्रभर चाललेल्या वादळामुळे त्यांना नीट झोप आली नाही. दुसऱ्या दिवशी दोन टेकड्या ओलांडून सातमैल पदयात्रा करीत विनोबा मांडवा गावी आले. त्यांना वाटेत त्यामुळे फार कष्ट पडले. तसेच त्यांना कानाचे दुखणे परत सुरू झाले. आणि कमजोरी वाटू लागली. ता. १३ जूनला सकाळी त्यांना चक्कर येऊ लागले. त्यामुळे नित्याप्रमाणे सकाळी साडेतीनला ते पदयात्रा सुरू करू शकले नाहीत. एकतास विश्रांति घेतल्यावर पवनूर गावाकडे पदयात्रा करण्याचा त्यांनी पुन्हा प्रयत्न केला. परंतु ते शक्य झाले नाही. तेव्हा विनोबा मोटारीत बसले व पवनूर गावाजवळ आले व तेथे पुन्हा त्यांनी पायी चालण्यास सुरुवात केली. नंतर सभेत ते बोलले. दिवसभर चर्चा करीत होते. आता त्यांची तब्बेत तशी बरी आहे. सिव्हिल सर्जन व अन्य डॉक्टरांनी तब्बेत तपासली. लोब्लड प्रेशर त्यांना आहे. ९०–११५ च्या दरम्यान त्यांचे प्रेशर राहते. त्याशिवाय लघवीतून अल्पप्रमाणात साखर जाते. काळजी घेतली नाही तर मधुमेहाची शक्यता व्यक्त करण्यात येते. विनोबाजींनी मध पूर्वीच घेणे बंद केले होते. मध्यंतरी सेवक मंडळींनी त्याऐवजी साखर घेण्याचा आग्रह केला परंतु साखरहि न घेण्याचा विनोबांचा विचार होत आहे. कानाचा त्यांना त्रास झाला म्हणजे मग चक्कर यायला लागतात. विनोबाजी विनोदाने म्हणालेहि 'आतापर्यंत मी पृथ्वी भोवती फिरत होतो आता पृथ्वी माझ्या भोवती फिरू लागली आहे.'

त्यानंतर विनोबा १५, १६, १७ तारखेला पदयात्रा करीतच मुक्कामावर गेले. डॉक्टरांनी त्यांना आठवडाभर विश्रांतीचा सल्ला दिला आहे. ता. १९, २०, २१ ला विनोबा पवनारला परंधाम आश्रमात सर्व सेवा संघाच्या बैठकीत भाग घेतील. त्यावेळी एक आठवडा पवनारला विनोबांनी थांबावे व कार्यकर्त्यांनी प्रचार करावा अशी पूर्वीच योजना घाटत होती. तेव्हा विनोबा पवनारलाच सात आठ दिवस थांबतील. श्री. शेख अब्दुल्ला हे पवनारलाच त्यांना भेटतील. त्यानंतर परत त्यांची पदयात्रा चालू होईल.

---

संपादक:– श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक:– श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रक:– श्री. वामनराव पाचपांडे, नई तालीम मुद्रणालय, सेवाग्राम.
स्वामित्व:– महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग : दैनिक पुरवणी ता. १७-६-६४ अं. ८६ र. नं. एन्. २९५

विनोबा वार्ता, सेवाग्राम जि. वर्धा (महाराष्ट्र राज्य)

श्री. ______________________

______________________